"बेटी बचाओ - बेटी पढाओ" या केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी नवीन लेखाशिर्ष मंजूर करणे तसेच निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१५/प्र.क्र.३००/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ११ जानेवारी, २०१६

वाचा :- १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.१९३/का.०६, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१५
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.पुरक-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थसंकल्प-३, दिनांक ०१ जानेवारी, २०१६
३) शासन ज्ञापन, महिला व बाल विकास विभाग, क्र.बीजीटी-२०१५/प्र.क्र.७३/का-४, दिनांक ०६ जानेवारी, २०१६

शासन निर्णय :- उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये "बेटी बचाओ - बेटी पढाओ" हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राज्यातील खालीलप्रमाणे १० जिल्हयात सन २०१४ ते सन २०१७ या कालावधीत राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

अ. क्र.	जिल्हा	मुलांचे लिग गुणोत्तर सन २०११ च्या जनगणनेनुसार
१	बीड	८०७
२	जळगांव	८४२
३	अहमदनगर	८५२
४	बुलढाणा	८५५
५	औरंगाबाद	८५८
६	वाशिम	८६३
७	कोल्हापूर	८६३
८	उस्मानाबाद	८६७
९	सांगली	८६७
१०	जालना	८७०

२. सदर नवीन योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १६३/अर्थ-७, दिनांक ०५/११/२०१५ व प्रधान महालेखाकार यांचे कार्यालय (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अनौपचारिक संदर्भ क्र.ख.वि/चा-१/महिला तथा बाल विकास/यू ओ आर-१३२/२०१५-१६/९०२, दिनांक १६/११/२०१५ आणि नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४४३/१४७२, दिनांक १७/११/२०१५ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार बेटी बचाओ-बेटी पढाओ या योजनेसाठी खालीलप्रमाणे नवीन लेखाशिर्ष निर्माण करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

"मागणी क्रमांक एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०३, महिलांचे कल्याण, (२५) मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी योजना, (२५) (०३) बेटी बचाव-बेटी पढाव योजना (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना), (२२३५ बी ४९७) (योजनांतर्गत), २६-जाहिरात व प्रसिध्दी"

३. बेटी बचाओ-बेटी पढाओ या योजनेकरिता सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात रु.२,४०,७३,०००/- एवढया रक्कमेची पुरवणी मागणी विधान मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती. सन २०१५-१६ या वर्षाचे खर्चाचे पुरक विवरणपत्र दिनांक ०८ डिसेंबर, २०१५ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आले. सदर पुरवणी खर्चास आता विधानसभेने मान्यता दिली आहे. दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षाच्या विनियोजनामध्ये समाविष्ट करण्यासाठी पुरवणी विनियोजन विधेयकास राज्यपालांनी संमती दिली असून ते महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक २१ डिसेंबर, २०१५ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहे.

४. बेटी बचाओ-बेटी पढाओ या योजनेसाठी रु.२,४०,७३,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी चाळीस लाख त्र्याहत्तर हजार फक्त) एवढया रक्कमेची पुरवणी मागणी मंजूर झालेली असून सदरहू पुरवणी मागणीची रक्कम संदर्भ क्र.३ येथील ज्ञापनान्वये आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे / आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांना **"नियंत्रक अधिकारी"** म्हणून सुपूर्द करण्यात आलेली आहे.

५. तथापि, बेटी बचाओ-बेटी पढाओ ही योजना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांच्या कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना **"नियंत्रक अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर योजनेसाठी पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेला रु.२,४०,७३,०००/- एवढया तरतूदीपैकी ५०% तरतूद म्हणजेच रु.१,२०,३६,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी वीस लाख छत्तीस हजार पाचशे फक्त) एवढी तरतूद बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना या जिल्हयांकरिता वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी त्यांच्या स्तरावरुन संबंधित जिल्हयांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आवश्यक निधी बी.डी.एस. प्रणालीद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

७. सदरहू योजनेवर होणारा खर्च वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११११०१७२५६१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vasave Vijesing F

Digitally signed by Vasave Vijesing F
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasave Vijesing F
Date: 2016.01.11 15:57:14 +05'30'

(वि. फ. वसावे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
४) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) मा. सर्व विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६) सर्व मंत्रालयीन विभाग
१७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
१९) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
२०) सर्व विभागीय आयुक्त
२१) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
२२) **जिल्हाधिकारी,** बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२३) **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,** बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२४) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
२५) **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी**, बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना

२६) **जिल्हा कोषागार अधिकारी**, बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२७) **जिल्हा आरोग्य अधिकारी,** बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२८) वित्त विभाग/व्यय-६, मंत्रालय, मुंबई
२९) नियोजन विभाग/का.१४७२, मंत्रालय, मुंबई
३०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३१) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
३२) **उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद,** बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
३३) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी / नागरी)
३४) महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
३५) निवड नस्ती (कार्यासन ६)